मकामुना(जे.124)–7–96–2,00,000 पु. / 3 पा.(6,00,000)–पीए4
कि.प्रो.कोड शेडयुल्ड 1, परिशिष्ट जी.क. 1
शा.प.वि.व.न्या.वि.क.एसबीएफ / 1180 / 45 / 10 / चार दि.4.4.81 अन्वये सुधारित

दिवाणी अ 37 प.
Civ. A 37 M

अव्वल मुकदम्यात
हुकुमनामा (ऑर्डर 20,
कानू 6,7)
(फॉर्म नं. 1 पुरवणी
इ. परिशिष्ट 1).

# हुकूमनामा

## IN THE COURT OF THE JT. CIVIL JUDGE J.D., AT UDGIR

**R.C.S.NO. 1533/2023** **Exh.18**

**(CNR No.MHLA09-005117-2023)**

**राजेश्री भ्र.दशरथ पंढारे,**

वयः ३० वर्षे, धंदाः घरकाम,

रा.मुर्की ता.कमालनगर जि.बिदर ... वादी

विरुध्द

**फयाज पि.रशिद शेख,**

वयः ४५ वर्षे, धंदाः शेती,

रा.उदगीर ता.उदगीर जि.लातूर ... प्रतिवादी

दावाः- मौजे बनशेळकी ता.उदगीर जि.लातूर येथील सर्वे नं.५३/४ मधील प्लॉट क्र.१४ ज्याचे पुर्व पश्चिम ४० फुट, दक्षिण उत्तर ३० फुट दि.०५.०५.२०२३ रोजी करण्यात आलेल्या कराराची पुर्तता करणे बाबत.

Date of Institution : 01-01-2024

Date of Disposal : 10-07-2026

ता. १० माहे ०७ सन २०२६ रोजी सह दिवाणी न्यायाधिश क स्तर, उदगीर समोर **वादीतर्फे वकील श्री. वाय. ए. शेख व प्रतिवादी तर्फे वकील श्री. ए. ए. परकोटे** अखेर निकालासाठी मुकदामानिपात्या वरून असा हुकूम होत आहे की,

## आदेश
(१०.०७.२०२६)

वादी व प्रतिवादी यांनी नि.क्र. १७ वर तडजोडपत्र सादर केले आहे. त्यांना तडजोड मान्य व कबूल असल्याने सदरचा दावा नि.क्र.१७ च्या तडजोडीप्रमाणे निकाली काढण्यात येतो. नि.क्र.१७ च्या तडजोडपत्रा प्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा. न्यायालयीन शुल्क नियमाप्रमाणे वादीला परत करण्यात यावे.

सही/-

(श्री. व्ही. आर. घराळ )
सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) उदगीर.

Presented by Shri Y. Pasupati Adv -63-
On 22/12/23

Asstt. Supdt.

# मे. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर उदगीर यांचे न्यायालयात

दि.दा.क्र. 1533/2023

Exh 1

**राजेश्री भ्र. दशरथ पंढारे**
वय 30 वर्ष, धंदा - घरकाम
रा. मुर्की ता.कमालनगर जि.बिदर

......वादी

**विरूध्द**

**फयाज पि. रशिद शेख**
वय 45 वर्ष, धंदा - शेती
रा. उदगीर ता.उदगीर जि.लातूर

प्रतिवादी ......

दावा :- मौजे बनशेळकी ता. उदगीर जि.लातूर येथील सर्वे नं. 53/4 मधील प्लॉट क्र. 14 ज्याचे पुर्व पश्चिम 40 फुट, दक्षिण उत्तर 30 फुट दि. 05.05.2023 रोजी करण्यात आलेल्या कराराची पुर्तता करणे बाबत.

## सन्माननीय न्यायालयास नम्र निवेदन

वादी आपला दावा मे. न्यायालयात दिवाणी प्रक्रिया संहीताचे आदेश सात नियम एक अन्वये पुढीलप्रमाणे दाखल करीत आहे.

1. हे की, प्रतिवादी यांनी त्यांच्या मालकी व ताब्यातील मौजे बनशेळकी ता. उदगीर जि.लातूर येथील सर्वे नं. 53/4 मधील प्लॉट क्र. 14 ज्याचे पुर्व पश्चिम 40 फुट, दक्षिण उत्तर 30 फुट ज्याची चर्तु:सिमा खालील प्रमाणे.

**पुर्वेस** : प्लॉट नं. 13

**पश्चिमेस** : 20 फुटाचा रोड

**दक्षिणेस** : प्लॉट नं. 15

**उत्तरेस** : मळगे यांची जमीन

या चर्तु:सिमेच्या आतील प्लॉटचा वादीसोबत रक्कम रू. 40,000/- अक्षरी (चाळीस हजार रू.) मध्ये कायम विक्रीचा ठराव दि. 05.05.2023 रोजी केला असून बयाना / पूर्ण रक्कम प्रतिवादीने वादीकडून पुर्ण रक्कम रू. 40,000/- अक्षरी (चाळीस हजार रू.) स्विकारले आहे व कागदपत्राची पुर्तता करुन दि. 05.10.2023 पर्यंत घेवून सदर प्लॉटचे वादीचे नावाने खरेदीखत करून देण्याचे ठरले होते.

2. हे की, ठरल्याप्रमाणे वादीने दि. 05.10.2023 रोजी प्रतिवादीकडे जावून प्लॉटचा वादीचे हक्कात वरील नमुद प्लॉटचे खरेदीखत करून देण्याची विनंती केली असता प्रतिवादीने वादीचे हक्कात खरेदीखत करून देण्यास कांही ना कांही कारण सांगून टाळाटाळ केली.

3. हे की, म्हणून वादीने प्रतिवादींना दि.06.10.2023 रोजी दि.05.05.2023 रोजीच्या ठरावानुसार वादीचे हक्कात वादग्रस्त प्लॉटचा खरेदीखत करून देण्यासंबंधीची विधीज्ञामार्फत कायदेशीर नोटीस पाठविली. प्रतिवादीस नोटीस मिळूनही प्रतिवादींनी अद्यापपावेतो वादीच्या हक्कात वादग्रस्त प्लॉटचे खरेदीखत करून दिलेले नाही अथवा वादीच्या नोटीसचे कसलेही उत्तर दिलेले नाही. म्हणून वादीस प्रतिवादीविरूध्द सदरचा दावा दाखल करण्यास दि.06.11.2023 रोजी कारण घडले आहे. तेंव्हापासून वादीचा दावा योग्य मुदतीत आहे.

4. हे की, वादी वादग्रस्त प्लॉटचा पूर्ण मोबदला पुर्वीच घेवून देखील प्रतिवादी खेदीखत करून देण्यास तयार नाहीत. व उडवा उडवीचे उत्तरे देत आहेत. तरी मे.साहेबांनी प्रतिवादीस सदर वादग्रस्त प्लॉटचे खरेदीखत वादीच्या हक्कात करून देण्याचे आदेश करणे योग्य व न्यायाचे आहे.

5. हे की, वादीचा दावा कराराच्या पुर्ततसाठी असून वादी आपल्या दाव्याचे मुल्यांकन न्यायालयीन क्षेत्रासाठी आणि कोर्ट फिससाठी वादग्रस्त जागेची बाजारी किंमत रू. 40,000/- अक्षरी (चाळीस हजार रू.) इतकी करीत असून त्यावर ठराविक कोर्ट फिस रक्कम रू. 1107 /- वादी

भरणा करीत आहे जी महाराष्ट्र कोर्ट फिस ॲक्ट नुसार योग्य व बरोबर आहे.

6. हे की, वादी व प्रतिवादीचे राहण्याचे ठिकाण, दावा मिळकतीचे ठिकाण, तसचे दावा दाखल करण्यास कारण घडल्याचे ठिकाण मे. न्यायालयाच्या कार्यक्षेत्राच्या येत असल्यामुळे मे. न्यायालयात सदरचे प्रकरण चालविण्याचा पुर्ण अधिकार आहे.

7. हे की, वादग्रस्त मिळकतसंबंधी सदर दाव्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित नाही.

8. हे की, प्रस्तुत दाव्यात आवश्यक वाटल्यास मे. न्यायालयाच्या पुर्व परवानगीने बदल, दुरुस्ती, करण्याचा अधिकार वादी अबादित ठेवीत आहे.

## तरी विनंती की

मे. साहेबांनी वादीचा दावा खालीलप्रमाणे खर्चासह डिक्री करण्याची कृपा करावा.

1. हे की, प्रतिवादी योन वदी व प्रतिवादी यांच्ययात वादग्रस्त प्लॉटसंबंधी झालेल्या दि.5.05.2023 रोजीच्या ठरावानुसार कराराची पुर्तता करण्याचा आदेश प्रतिवादीस करण्यात यावा.

2. हे की, जर प्रतिवादीने वादग्रस्त प्लॉटचे वादीच्या हक्कात खरेदीखत करून देण्यास कसुर केल्यास मे. न्यायालयाने वादीकडून वादग्रस्त प्लॉटचा पुर्ण मोबदला रक्कम रू. 40,000/- पूर्वीच स्वकारल्यामुळे कोर्ट कमीशनर मार्फत वादग्रस्त प्लॉटचे वादीच्या हक्कात खरेदीखत करून देण्यास यावे.

राजश्री

3. हे की, जर वादग्रस्त करार पुर्तता करण्यासाठी कांही कायदेशीर अडचणीमुळे बाधा येत असल्यास प्रतिवादींनी वादीकडून बयाना/इसारपोटी स्विकारलेली रक्कम 12 टक्के व्याज दराप्रमाणे वादीस देण्यास आदेश करण्यात यावा.

4. दाव्याचा संपुर्ण खर्च वकीलासह वादीस प्रतिवादीकडून देण्यात यावा.

5. वादीच्या हिताचे व न्यायाचे आवश्यक ते अन्य हुकूम व्हावेत.

दिनांक :21 /12/2023

वादी

राजश्री

**राजश्री भ्र. दशरथ पंढारे**
रा. मुर्की ता.कमालनगर जि.बिदर

**तसदीक** :

मी वादी शपथेवर निवेदन करते की, प्रस्तुत दाव्यातील संपुर्ण मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला असून तो मला वाचून दाखविण्यात आला असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर असल्याची खात्री करून आज रोजी उदगीर मुक्कामी तसदिक केली आहे.

दिनांक :21 / 12/2023

वादी

राजश्री

**राजश्री भ्र. दशरथ पंढारे**
रा. मुर्की ता.कमालनगर जि.बिदर

तर्फे

**अॅड.वाय.ए.शेख**
**उदगीर**

# मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर उदगीर

## यांचे न्यायालयात

दि.दा. क्र. 1533/ 2023

राजश्री

**विरुध्द**

फयाज

दावा .कराराची पुर्तता करणे बाबत.

## तडजोडपत्र

हे की, वादी व प्रतिवादी आपली तडजोड मे. न्यायालयात खलीलप्रमाणे दाखल करीत आहेत.

1. हे की, वादी व प्रतिवादी यांच्यातील भविष्यत संबंध चांगले सुखासमाधानाचे व शांततेचे राहावेत म्हणुन गावातील प्रतिष्ठित पंचानी वादी व प्रतिवादी यांच्यात तडजोड घडवून आणली जी उभय पक्षांना मान्य व कबुल आहे.

2. हे की, वादीने दिलेला दावा प्रतिवादीला मान्य व कबुल आहे.कारण तो वस्तुस्थितीला धरून आहे.

3. हे की,वादी व प्रतिवादी यांच्यात झालेल्या सदर तडजोडीनुसार प्रतिवादीने यांच्या मालकी व ताब्यातील मौजे बनशेळकी ता.उदगीर येथील जमीन भु.क्र.53/4, मधील प्लॉट क्र.14 ज्याचे क्षत्र पुर्व पश्चिम 40 फुट, दक्षिण उत्तर 30 फुट एकुण 1200.चौ. फुट ज्याची चतुरसिमा खलील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | प्लॉट नं.13 |
| पश्चिमेस | : | 20 फुटाचा रोड |
| दक्षिणेस | : | प्लॉट नं. 15 |
| उत्तरेस | : | मळगे यांची जमीन |

या प्लॉटचा वादीसोब दि.05/05/2023 रोजी रक्कम रु.40,000/- (आक्षरी चाळीस हजार रु.) मध्ये कायम विक्रिचा ठराव केला असल्याचे प्रतिवादीस मान्य व कबुल आहे

.सदर ठरावाची पूर्ण रक्कम प्रतिवादीस रक्कम रु.40,000/- ( अक्षरी चाळीस हजार रु.) दिल्याचे प्रतिवादीस मान्य व कबुल आहे. व सदर प्लॉट चा ताबा वादीस पंचासमक्ष मिळाला आहे व प्रतिवादीस यांना मान्य व कबुल आहे.

4. हे की, सदर तडजोडीनुसार वादि व प्रतिवादी यांच्यात वाद पर्णतः संपुष्टात आला असून सदर या पुढे वादीने वादग्रस्त प्लॉटवर काबीज राहून उपभोग घेत जावे हे प्रतिवादीस मान्य व कबुल आहे. तसेच प्रतिवादीने यापुढे वादीच्या ताब्यात कसल्याही प्रकारचा अडथळा किंवा हस्तक्षेप करणार नसल्याचे मान्य व कबुल केले आहे.

5. हे की, सदर प्रकरणातील प्रतिवादी यांनी मान्य व कबूल केले आहे की, सदर वाद मिळकतीच्या कागदपत्राची पुर्तता करून व अकृषी / गुंठेवारी करून कायदेशीर रित्या पंजीकृत खरेदीखत वादीच्या नावे करून देण्यास तयार आहेत.

6. हे की, सदर तडजोडीनुसार प्रतिवादी यांनी वादीस वादग्रस्त प्लॉटचे तडजोडीनुसर जरी वादीने ताब्यानूसार स्वतःच्या नावाने ग्राम पंचायतला नोंद करून घेतल्यास प्रतिवादीची कसलीही तक्रार व उजर राहणार नाही.

हे की,सदर तडजोडीचा खर्च ज्याचे त्यांनी सोसावस.

**<u>तरी विनंती की</u>**

मे.साहेबांनी वादी व प्रतिवादी यांची तडजोड मंजुर करून वादीचा दावा तडजोडीनुसार डिकी करण्याच क्रपा करावी..

दि.10 /07/2026

वादी

राजश्री

राजश्री भ्र. दशरथ पंढारे

प्रतिवादी

फयाज पि.रशीद शेख

वादीचे वकील

ॲड.वाय.ए.शेख

प्रतिवादीचे वकील

अॅड : ए.ए. पठाण

प्रतिवादी याने दाव्याच्या खर्चाबदल रक्कम रूपये आज तारखेपासून उप्रापतीच्या तारखेपर्यत त्यावर दरसाल दर शेकडा टकके दराने होणा–या व्याजासह वादी याना द्यावे.

## खर्चाचा आकडा

| | वादीला झालेला | | | | प्रतिवादीला झालेला | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रूपये | पैसे | | | रूपये | रूपये |
| 1 | फिर्याद अर्जास स्टॅम्प | 1107 | =00 | 1 | बजावटीला किंवा विरूध्द दाव्यास स्टॅम्प | 0 | 0 |
| 2 | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प | 10 | =00 | 2 | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प | 10= | 0 |
| 3 | एकूण पुढील बाजूवर दिलेली | 5 | =00 | 3 | एकूण पुढील बाजूवर दिलेली | 0 | 0 |
| 4 | साक्षीदारास पोटगी | 0 | | 4 | साक्षीदारास पोटगी | 0 | 0 |
| 5 | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडकरांची फी विरूध्द दाव्यातील प्लीडकराची फी | 862 | =00 | 5 | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडकरांची फी विरूध्द दाव्यातील प्लीडकराची फी | 862= | 0 |
| 6 | प्रोसेस लागू करणे | 0 | | 6 | प्रोसेस लागू करणे | 0 | 0 |
| 7 | कमिशनरची फी | 0 | | 7 | कमिशनरची फी | 0 | 0 |
| 8 | भाषांतराची फी | 0 | | 8 | भाषांतराची फी | 0 | 0 |
| 9 | नकला करण्यासाठी फी | 0 | | 9 | नकला करण्यासाठी फी | 0 | 0 |
| 10 | तहकुबीबदल दिलेला वारस दाखल करण्याबदलच्या | 0 | | 10 | तहकुबीबदल दिलेला वारस दाखल करण्याबदलच्या | 0 | 0 |
| 11 | अर्जावरील स्टॅम्प | 0 | | 11 | अर्जावरील स्टॅम्प | 0 | 0 |
| | **एकूण** | **1984** | =00 | | **एकूण** | **872**= | **0** |
| | न दिलेला खर्च | 0 | | | न दिलेला खर्च | 0 | 0 |
| | फिर्याद अर्जावरील | 0 | | | विरूध्द दाव्यावरील | 0 | 0 |
| | प्लीडरच्या फीवरील प्रोसेसीवरील | 0 | | | प्लीडरच्या फीवरील प्रोसेसीवरील | 0 | 0 |
| | दाखल झालेल्या कागदावरील (पुढील बाजूवर पहा) | 0 | | | दाखल झालेल्या कागदावरील (पुढील बाजूवर पहा) | 0 | 0 |
| | **बाकी** | **1984** | =00 | | **बाकी** | **872**= | **0** |

आज तारीख 10 माहे 07 सन 2026 रोजी आमच्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला.

लिपिक

वादीतर्फे वकील

प्रतिवादीतर्फे वकिल

( व्ही. आर. घराळ )
सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, उदगीर

(हया मुकत्म्यातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर कलेले कोणतेही दस्तऐवज तज ते परत नेले नसते तर अपील झाले असल्यास अपीलाचा निकाल झाल्यावर नाश करून टाकण्यास पात्र होतील.)

| वादीकडून | | | | प्रतिवादीकडून | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दिलेला खर्च दाखल झालेले कागद नंबर | रूपये | पैसे | | दिलेला खर्च दाखल झालेले कागद नंबर | रूपये | पैसे | |
| नि.क्र. १०/०५ | ०५ | ०० | | | | | |
| एकूण | ०५ | ०० | | | | | |
| दिलेला खर्च दाखल झालेले कागद नंबर | | | | दिलेला खर्च दाखल झालेले कागद नंबर | | | |
| एकूण | ०५ | ०० | | एकूण | | | |